महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक:२१ मार्च, २०२३.

क्रमांक:६२४९/क-१, या सचिवालयातील प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या **"उप सचिव"** (एस-२५:७८८००-२०९२००) या पदावर अवर सचिव संवर्गातील खालील अधिकाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री.सं. ना. पराडकर, अवर सचिव (प्रपत्र बढती- मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये यांचे विशेष कार्य अधिकारी पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत) |
| २. | श्री.सु. श्री. नलावडे, अवर सचिव |
| ३. | श्री.नि. शि. दळवी, अवर सचिव (प्रपत्र बढती- मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात विशेष कार्य अधिकारी पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत) |

२. श्री.सं. ना. पराडकर व श्री.नि. शि. दळवी, अवर सचिव यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र. १८ नुसार तात्पुरत्या स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील. त्यानंतर श्री. पराडकर व श्री. दळवी यांनी या सचिवालयात हजर होणे आवश्यक राहील.

३. संबंधित अवर सचिवांना उप सचिव पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) सदरची पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात आली आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अवर सचिवांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

..२/-

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ उप सचिव यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी उप सचिव संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अवर सचिवांना पदावनत करण्याच्या अधीन सदर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सायली कांबळी)**
उप सचिव (विधी),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

**<u>प्रतिलिपी :-</u>**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

३) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

५) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई

६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

७) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

..३/-